# वसई - विरार शहर महानगरपालिका

## प्रभाग समिती 'ए' बोळींज

### जाहिर निविदा सूचना क्र.

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'अे' बोळींज कार्यक्षेत्रातील खालील उल्लेख केल्या प्रमाणे विकास काम करणेसाठी शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून बी - १ नमुन्यात द्विलखोटा पद्धतीनुसार महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म दि. ०९/१०/२०२५ ते दि. १६/ १० /२०२५ या दिवशी सायं.४.०० वाजेपर्यंत सुट्टीच्या दिवसांखेरीज महानगरपालिकेच्या प्रभाग समिती प्रभाग समिती 'अे' बोळींज कार्यालयातील बांधकाम विभागात रोखीने विकत मिळतील. सदर कामांची इसारा रक्कम आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका या नावे देय असलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे भरावी लागेल व सदर डिमांड ड्राफ्ट निविदा सोबत जोडावा लागेल. डिमांड ड्राफ्टद्वारे इसारा व भरलेल्या, खाडाखोड केलेल्या, मुदतीत न आलेल्या व सशर्त निविदा नाकारण्यात येतील. सदर कामी पुर्णपणे भरलेल्या मोहरबंद निविदा दि. १७ /१० /२०२५ रोजी दु.२.०० वाजे पर्यत महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'अे' बोळींज कार्यालयातील बांधकाम विभागाकडे बंद निविदा पेटीमध्ये टाकण्यात याव्यात. प्राप्त निविदा प्रभाग समिती 'अे' बोळींज कार्यालयात निविदा समिती समोर हजर निविदा धारक अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष शक्यतो त्याच दिवशी सायं.४.०० वा. प्रथम तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र.१ उघडण्यात येईल. लिफाफा क्र.१ मध्ये सविस्तर निविदा सुचनेमध्ये दर्शविल्यानुसार कागदपत्रे असल्यास वित्तीय बोलीचा लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल. या कामी आलेल्या निविदा पैकी कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे. त्यांची कारणे दिली जाणार नाहीत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम रुपये | निविदा फॉर्म फी | सुरक्षा अनामत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रभाग समिती 'ए' बोळींज कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.१७ मधील तिरुपती नगर येथील भाजी मार्केट शेड मधुन पाणी गळती रोखण्याकरिता फ्लेक्स शीट बसविणे. | रु.८,७३,१२८/- | रु.८,७३१/- | रु.५००/- + १८% जी.एस.टी ५९०/- | २% डी.डी.ने. व २% बिलातून | ६० दिवस |

**अटी शर्ती :-**

१) निविदा फॉर्म खरेदीची अंतिम दि. **१६ / १० /२०२५** रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत राहील.

२) लिफाफा क्र. १ मध्ये खालील कागदपत्रांच्या छायांकीत प्रतींचा समावेश असणे आवश्यक आहे.

i) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

ii) कामाचे अनुभव प्रमाणपत्र –निविदेतील कामांस खालीलप्रमाणे किमान कार्यकारी अभियंता / सक्षम दर्जाच्या अधिकाऱ्याचे अनुभव प्रमाणपत्र आवश्यक आहे.
वॉर्ड क्र.१७ मधील तिरुपती नगर येथील भाजी मार्केट शेड मधुन पाणी गळती रोखण्याकरिता फ्लेक्स शीट बसविणे. – शेड दुरुस्ती करणे किंवा त्याकामासंबंधित किमान रु.२.६१ लक्ष किंमतीचे एकच काम पुर्ण केल्याचे किमान कार्यकारी अभियंता अथवा सक्षम दर्जाच्या अधिकाऱ्यांचे कामाचे अनुभव प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

iii) GST नोंदणी प्रमाणपत्र.

iv) रु. १००/- व ५००/- स्टॅम्पपेपरवर प्रतिज्ञापत्र.

३) सदरची कागदपत्रे लिफाफा क्र. १ मध्ये नसल्यास संबंधीत निविदा धारकास अपात्र ठरविण्यांत येईल व फक्त पात्र निविदाधारकांच्या स्पर्धात्मक निविदा बोलीचा लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल.

४) अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा कमी किंमतीचा देकार सादर करण्याऱ्या निविदा धारकांनी लिफाफा क्र. २ उघडल्यानंतर प्रथम न्यूनतम देकार सादर करणाया L-१ निविदाकाराने "**Additional Performance Security Deposite**" आठ दिवसाच्या आत संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडे डी.डी. जमा करावा. ही आठ दिवसांची मुदत कोणत्याही कारणासाठी शिथीलक्षम असणार नाही.

५) प्रथम न्यूनतम देकाराच्या (L-१) निविदाकाराने वरील विहित मुदतीत "**Additional Performance Security Deposite**" चा भरणा केला नाही तर व्दितीय न्यूनतम देकाराच्या (L-२) निदिाकारास लेखी विचारणा करण्यात येईल.

६) अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा कमी किंमतीचा देकार असल्यास इसारा रक्कमे बरोबर अतिरिक्त जमा करावा लागणारे परफॉमन्स सिक्युरीटी पुढील प्रमाणे देकार १५% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरीत रक्कमेसाठी दोन पटीने रक्कम डी.डी.ने सादर करणे अनिवार्य राहील. (उदा. १९% कमी दरासाठी पुढील प्रमाणे पृथ:करण १०% कमी दरापर्यंत १% व १५% कमी दरापर्यंत (१५% - १०% = ५% ) तसेच ( १९% - १५% ) = ४% करीता (४% x २ % = ८%) असे एकूण ( १% + ५ %+ ८% = १४%)

७) निविदाकारांनी कोरी निविदा फॉर्म फी, इसारा अनामत रक्कम व सेवाशुल्क ऑनलाईन पेमेंट भरावयाचे आहे. त्याची स्कॅन कॉपी लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावी अन्यथा त्या निविदाकाराचे टेक्नीकल/फायनांशिअल लिफाफा उघडले जाणार नाहीत. तसेच वरीलल नमुद सर्व शुल्क डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड, नेट बँकींग, RTGS व NEFT मार्फत भरणा करता येईल.

८) कंत्राटदारांनी निविदा भरताना GST करासहीत दर भरावेत.

९) ठेकेदारांनी निविदा भरताना दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करावा तसेच क्र. १ च्या लिफाफ्यात तांत्रिक बाबींची कागदपत्रे व क्र. २ च्या लिफाफा मध्ये वित्तीय बाबींची कागदपत्रे सादर करावीत.

१०) मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा शक्यतो त्याच दिवशी दु. ३ वाजून ०१ मी. उघडण्यात येतील.

११) कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा किंवा आलेल्या सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, वसई विरार शहर मनपा यांनी राखून ठेवला आहे.

१२) इतर सविस्तर अटी-शर्ती निविदा फॉर्ममध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

जा.क्र. : वविशम/ बांध/ ७३३ /२०२५
दिनांक :- ०८/१०/२०२५

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (सतीषकुमार सुर्यवंशी ) | (संजय कुलकर्णी ) |
| उप अभियंता | कार्यकारी अभियंता |
| व.वि.श.म. | व.वि.श.म. |